**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**उन्हाळी - २०१९ परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखांमध्ये वाढ**
**विद्यार्थी व महाविद्यालयांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन**
**परीक्षा आवेदनपत्रे सादर करण्याची अंतीम संधी**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, अधिसूचना क्रमांक १०/२०१९ दिनांक १७/०१/२०१९ मधील नमूद दुसऱ्या टप्प्यातील शनिवार, दिनांक २७ एप्रिल, २०१९ पासून व पुढे तसेच तिसऱ्या टप्प्यातील सोमवार, दिनांक १३ मे, २०१९ पासून व पुढे सुरु होणाऱ्या उन्हाळी - २०१९ च्या विद्यापीठीय सत्रपद्धती व वार्षिक पद्धती अभ्यासक्रमाच्या नियमित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे तसेच माजी व बहि:शाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखेमध्ये वाढ करण्यात आली असून सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे महाविद्यालयाच्या प्राचार्याचे शिफारस पत्रासह आवश्यक शुल्क व विहीत केलेल्या विलंब शुल्कासह प्रती दिवस रूपये ५०/- याप्रमाणे दि. २५ मार्च, २०१९ पर्यंत विद्यापीठात सरळ स्वीकारण्यात येतील.

विद्यापीठ परीक्षा विभागाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून उक्त परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे विद्यापीठात सादर करावयाच्या तारखेत वाढ केली आहे. विद्यार्थ्यांकरीता ही अंतीम संधी असून व्यक्तीगत व इतर कारणांमुळे ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे विद्यापीठात सादर करावयाचे राहून गेली असल्यास, अशा सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाने वाढवून दिलेली तारीख महाविद्यालयांनी अवगत करून देण्याचा प्रयत्न करावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

याबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख यांना पत्र पाठवून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी कळविले आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १५/०३/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी